# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. ०७१२– २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : rdtenagpur.org.in

क्रमांक : तंशिस/विकाना/शै.वि/डी.बी.टी/२०१९/ 1893
दि. 2 6 JUN 2019

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विना अनुदानित
पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:– शैक्षणिक वर्ष २०१९–२० साठी महाडीबीटी पोर्टलवरील नोंदणीकृत संस्थांनी महाराष्ट्र शासनाच्या योजनाकरिता संस्था प्रोफाईल/शैक्षणिक शुल्क अद्ययावत करण्यांबाबत.

संदर्भ :– संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांचे पत्र क्रमांक १८/तंशिसं/ डीबीटी/वि.का.पत्र–२०१९–२०/२९७ , दि. २१/०६/२०१९.

शैक्षणिक वर्ष २०१९–२० मधील राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी आपले सरकार च्या महाडीबीटी पोर्टलवरील नोंदणीकृत संस्थांचे शुल्क नियामक प्राधिकरण , मुंबई यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१९–२० मधील मंजूर झालेले शिक्षण शुल्क तसेच इतर शुल्क अद्यावत करण्यांकरिता दिनांक १९/६/२०१९ पासून सुरुवात झालेली आहे. तरी सर्व संस्थांनी त्यांना मागील वर्षी प्राप्त झालेल्या लॉगीन युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन मंजूर शिक्षण शुल्क व विकास शुल्क योग्य त्या कागदपत्रांसह अचूकरित्या व काळजीपूर्वक पोर्टलवर अद्ययावत करुन शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे कडे ऑनलाईन मान्यतेकरीता पाठवायचे आहे. तसेच संस्था संलग्न असलेल्या विद्यापीठ/मंडळ यांचे मान्य परिक्षा शुल्क या विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने मान्यतेकरीता पाठवायचे आहे.

तसेच ज्या संस्था शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून नव्याने सुरु झालेल्या आहेत व ज्यांनी अद्याप महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेली नाही अशा संस्थांनी त्यांना युजर आयडी व पासवर्ड मिळणेसाठी या विभागीय कार्यालयाकडे संपर्क साधावा. त्यासाठी त्यांनी या विभागीय कार्यालयाकडे महाराष्ट्र शासनाचा मान्यतेचा शासन निर्णय , संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांनी संस्थेस दिलेला डी.टी.ई कोडचे पत्र सादर करावे.

संबंधित संस्थांना सूचित करण्यांत येते की, शुल्क अद्ययावत करण्यांची ऑनलाईन प्रक्रीया तसेच नविन रजिस्ट्रेशनची प्रक्रीया प्राधान्याने पूर्ण करावी.

( डॉ.सी.एस.थोरात )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

प्रत :– मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरिता मानार्थ सादर